# <u>योग विद्येचा पोवाडा...</u>

**आधी नमु शारदापती । द्यावी मज मती । गातो तव कीर्ती ।**
**मुजरा हा सकल रसिक जनास ।**
**घ्या हो घ्या आरोग्याचा निजध्यास ।**
**गातो पोवाडा योग दिनास ।।जी।।**

**भारताची पुराण संस्कृती । घ्यावी प्रचिती । ऐका हो महती ।**
**शरीर मन -आत्म्याचा दुवा ।**
**सांधण्यासाठी योग हवा ।**
**मंत्र आरोग्याचा ध्यानी ठेवा ।।जी।।**

**चाल-**
**पतंजलींनी योगविद्येचा प्रसार हो केला ।**
**योगसूत्राने निरामय जीवनाचा बोध दिला ॥**

**ऋग्वेदातून आयुर्वेदाचा उगम हो जाहला ।**
**आयुर्वेदातून योगविद्येचा प्रवाह अवतरला ।।**

**आध्यात्मिक शक्तीचा संतमहंतांनी मार्ग दाविला ।**
**ज्ञान - कर्म आणि भक्तियोगाचा पाया तो रचिला ।।**

**चाल-**

**आरोग्याचा प्रश्न उद्भवला । रोगानं ग्रासलं शरीराला । जीवाला घोर लागला । जीवनाचा आनंद लोपला । यातून मार्ग एक भला ।**
**जवळ करा योग विद्येला ।**
**योग साधनेचा हा मंत्र देई आरोग्याला ।। जी ।।**

**चाल-**

**जन हो करा नित्य योग । दूर होईल रोग । रहा निरोग ।**
**योग विद्येची धरावी कास ।**
**आवाहन साऱ्या अबालवृद्धांस ।**
**विनवी शाहीर तुम्हा सकलांस ॥जी ।।**

**सूर्य देवाची अर्चना । नित्य उपासना । आरोग्य साधना ।**
**सूर्यनमस्कार बारा घाला ।**
**आरोग्याचा लाभ शरीराला ।**
**पंचमहाभूते वश तयाला ॥ जी ॥**

**जो नित्य करी प्राणायाम । करी अनुलोम । आणि विलोम ।**
**दूर होई शारीरिक आजार । नाही राहणार मनोविकार ।**
**योगविद्येचा हाची चमत्कार ॥ जी ॥**

**योगासन प्राणायाम करिता । मनाची शुद्धता । चित्त स्थिरता ।**
**देहातील नष्ट होती विकार ।**
**स्वस्थ निरोगी जीवन साकार ।**
**होई सुदृढ आपला परिवार ।। जी ।।**

चाल -

यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा ।
दीर्घ आयुरारोग्य आनंद देई योग जीवना ।।

करा योग आणि मिळवा आरोग्य हाची मंत्र स्मरा ।
सुखी समृद्ध जीवनाचा हाची मंत्र खरा ।।

चाल-

योग विद्येची परंपरा । ध्यानी तुम्ही धरा । प्रसार हो करा ।
योग विद्येची कास धरू ।
जागतिक योग दिना स्मरू ।
आपला भारत विश्वगुरू ।। जी।।

रचनाकार -
प्रा. शाहीर अजिंक्य सुरेश लिंगायत